# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 180 / 2024 दिनांक : 22.05.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 20.05.2024 रोजी चे 19.15 वा. चे सुमारास, **नृसिंह मंदीराजवळ विष्णुपूरी नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे त्यांची पांढऱ्या रंगाची टाटा पंच कार क्रं. एमएच–26 / सीई–0026 मध्ये बसुन त्यांच्या कुटूंबासह काळेश्वर मंदीरात देवदर्शनासाठी जात असतांना त्यांची कार ही विष्णुपूरी गावामध्ये नरसिंह मंदीराजवळ आली असता यातील नमुद आरोपीने फिर्यादीच्या कार जवळ येऊन शिवीगाळ करून फिर्यादीस व फिर्यादीच्या कुटूंबाला जिवे मारण्याच्या उदेशाने त्याच्या हातातील खंजरने कारवर डाव्या बाजुने वार केला कार रनींगमध्ये असल्याने तो वार चुकून कारच्या पाठीमागे बसला त्यानंतर आरोपीने त्याचे हातात दगड घेवुन फेकुन कारवर मारल्यामुळे कारचा पाठीमागील काच फुटून अंदाजे 5,000 / —रू चे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी बाबु नागोराव कदम, वय 61 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत एएसआय रा. सिध्दीविनायक नगर विष्णुपूरी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 401 / 2024 कलम 307,504,336, 427 भादवी सह कलम 4 / 25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री मटवाड, मो.क्रं. 9922778115** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :—** दिनांक 18.05.2024 रोजी चे 10.30 वा. चे सुमारास, **नाळेश्वर रोड वरील चक्रधर स्वामी मठाच्या कमानी जवळ ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद आठ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीच्या ताब्यात असलेली हायवा क्रमांक एमएच–26 / बीई–9289 ही आडवुन आरोपी क्रं 2 यांनी फिर्यादीस तु माझ्या बायकोला का बघतोस व माझ्या घरी कस काय आला होतास असे विचारले असता यातील फिर्यादी हा यातील आरोपीतांना घाबरून पळाला असता यातील आरोपीतांनी त्याचा पाटलाग करून त्यास खाली पाडले व त्यास लोखंडी रॉडने फिर्यादीचे पाठीत सपासप वार केले व लाकडाने फिर्यादीचे डाव्या पायाच्या फेंड्रीवर व उजव्या व डाव्या हातावर, पाठीवर, दोन्ही पायाला, मांडयावर मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. तसेच लाथा बुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केले. व तु पुन्हा कुनाच्या घराकडे बघीतलास तर तुला गावात राहु देणार नाही असे विजे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सुर्यकांत पि. उत्तमराव गजभारे, वय 35 वर्षे, व्यवसाय चालक रा. आलेगाव (स्वराती) पुर्णा ता. पुर्णा जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 65 / 2024 कलम 341, 307, 323, 143, 147, 148, 149, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री केजगीर, मो.क्रं. 8830763211** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**सोनखेड** :—दिनांक 20.05.2024 रोजी चे 17.30 वा. सुमारास, **फिर्यादीचे निसर्ग धाबा सोनखेड ते नांदेड रोडवरील ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा साक्षीदार यांचे सोबत निसर्ग धाब्यावर येऊन फिर्यादीस आम्हाला जेवन दे असे म्हणुन जेवनाची मागणी केली. त्यावेळी फिर्यादीने जेवन बनविण्यासाठी कुक नाही आज सोमवार आहे मटन नाही असे म्हणुन असे समजावुन सांगत असतांना फिर्यादीस लाथाबुक्याने व लाकडाने मारहाण करून फिर्यादीचे गल्यातील पैसे काढुन घेण्यास प्रतिकार करत असतांना यातील नमुद तीन आरोपीतांनी साक्षीदार यांचे डोक्यात खंजरने मारहाण करून जखमी केले तसेच तोंडावर मारहाण करून हॉटेलच्या गल्यातील नगदी 5,000 / —रूपये जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी योगेश्वर काशीनाथराव मोरे, वय 28 वर्षे, व्यवसाय हॉटेल मालक रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 74 / 2024 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री माने, मो. नं. 8208374495** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :—

**कंधार :—** दिनांक 19.05.2024 रोजी चे रात्री 10.00 ते दि. 20.05.2024 चे 03.30 चे दरम्यान, **इंद्रप्रस्थ बार अँड रेस्टॉरंट बसस्थानक कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीन फिर्यादीचे इंद्रप्रस्त बार अँड परवाना हॉटेलचे लाकडी दरवाजा तोडफोड करून हॉटेलमध्ये प्रवेश करून हॉटेलमधील काऊंटर जवळ ठेवलेले रॉयल स्टॅग विदेशी दारूचे सिल बंद चार बॉक्स किंमती 34,560 / —रूपये व गल्यातील नगदी 5,000 / —रू असा एकुण 39,560 / —रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी उमेश शिवाजी लुंगारे, वय 38 वर्षे, व्यवसाय हॉटेल व्यापारी रा. लुगांर गल्ली कंधार ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 164 / 2024 कलम 457, 380 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2059 सानप, मो. नं. 9823518955** हे करीत आहेत.

## 4)चोरी :—

**भाग्यनगर** :— दिनांक 20.05.2024 रोजी चे 02.00 वा. चे सुमारास, **दर्यापुर पाटीजवळ केटीआयएल कंपणीचे पार्कीगमध्ये नांदेड येथे**, यातील फिर्यादी व साक्षीदार यांनी केटीआयएल कंपणीचे पार्कीग मध्ये लावलेल्या दोन हायवाच्या एक्साईड कंपणीच्या चार बॅटऱ्या किंमती 50,000/—रूपयाच्या जुने वापरत्या हया कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अनिल जयवंतराव पाटील, वय 38 वर्षे, व्यवसाय गुत्तेदार रा. फरांदेनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 209/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2294 हुंडे, मो.क्रं. 7083182294** हे करीत आहेत.

## 5)जनावर चोरी :—

**लिंबगाव** :— दिनांक 18.05.2024 रोजीचे वेळ 23.00 ते दिनांक 19.05.2024 चे सकाळी 04.00 वा. चे दरम्यान, **मौ. आलेगाव शेत शिवार आखाडयावरून ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीने आखाडयावरील दोन बैल व म्हैस बांधुन चारापाणी करून घरी झोपण्यासाठी निघुन गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयांने फिर्यादीचे दोन बैल किंमती 50,000/—रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शहाजी पंडीतराव पाटील, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. आलेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 164/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2126 धोंडगे, मो.क्रं. 9763265999** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :—

**1)विमानतळ** :— दिनांक 30.12.2022 चे 17.00 ते दिनांक 25.02.2024 चे 11.00 पावेतो चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी संभाजीनगर व माहेरी गितानगर नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तुला निट स्वयपाक येत नाही व पतीने दारू पिऊन शिवीगाळ व मारहाण करून प्रिटींग प्रेस घेण्यासाठी माहेरहुन दहा लाख रूपये घेवुन ये म्हणुन शारिरीक व माणसीक छळ केला व घरातुन हाकलुन दिले. व पैसे नाही आणली तर जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 162/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/833 तेलंगे ,मो. क्रं. 9527343325** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद** :— दिनांक 15.11.2023 रोजी चे 10.00 चे सुमारास, **सुभेदारनगर परभणी व ह. मु. गंगाचाळ वजिराबाद नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस व्यवसायसाठी म्हणुन 60,000/—रू ची मागणी करून ती पुर्ण न केल्यामुळे फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. व पैसे नाही आणली तर जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 32 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 229/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1742 खानसोळे ,मो.क्रं. 9823101742** हे करीत आहेत.

## 7)दुखापत :—

**भाग्यनगर** :—दिनांक 21.05.2024 रोजी चे 03.00 वा. चे सुमारास, **बीएसएनल ऑफिसच्या बाजुला दिपनगर नांदेड येथे**, यातील फिर्यादीकडुन आरोपीचे वडीलांनी विकत घेतलेल्या कोथंबीरीचे 1200/—रूपये पैकी 400/—रूपये बाकी होते. फिर्यादीने आरोपीचे वडीलांस बाकी राहीलेले 400/—रूपये मागीतले असता आरोपीच्या वडीलांनी पैसे देण्यासा टाळाटाळा केली व तुझेकडुन विकत घेतलेली कोथंबीर खराब झाली आहे. आता तुझे कशाचे पैसे म्हणुन वाद केला या कारणावरून यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस लोखंडी रॉडने व खंजीर व काठीने मारहाण करून दुखापत केली. वगैरे **फिर्यादी सुरेश राम पवार, वय 33 वर्षे, व्यवसाय भाजीपाला विक्रेता रा. उल्हासनगर तरोडा बु. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 208/2024 कलम 324, 34 भादवि सह कलम 5/25, 27 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2294 हुंडे, मो. नं. 7083182294** हे करीत आहेत.

## 8)अपघात :–

**अर्धापुर :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे रात्री 00.30 वा. चे दरम्यान, चौरंबा पाटीजवळ पेट्रोल पंपाचे समोरील रोडवर **ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1)शेख सुभान शेख बुरानुद्दीन, वय 33 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. रेहान पार्क .–2 पुसद ता. पुसद जि. यवतमाळ** हा दिनांक 21.05.2024 चे 00.30 वा. मोटार सायकल क्रमांक एमएच–26/सीसी–1610 वर बसुन नरसी नामदेव येथुन नांदेडकडे जात असतांना तो चोरंबा पाटी जवळील पेट्रोल पंपाचे समोरील रोडवर आला असता एक आयचर टेम्पो क्रमांक एमएच–40/बीजी–9998 च्या चालकाने त्याचे ताब्यातील आयचर टेम्पो हा भरधाव वेगात हयगय व निष्काळजीपणे चालवित असतांना डिव्हायडरच्या कडेने जात असतांना यातील मयताचे मोटार सायकलला पाटीमागुन जोराची धडक देवुन डोक्यास गंभीर मार लागल्याने तो बेशुध्द पडल्याने त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना अर्धापुर येथे शरीक केले असता डॉक्टरांनी तपासुन मयत झाल्याचे घोषीत केले. सदर व्यक्तीच्या मरणास यातील नमुद आयचर चालक हा कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी मोहम्मद रेहान शेख बुरानुद्दीन, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. पार्वती नगर ता. पुसद जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं. 238/2024 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1074 नरवाडे, मो.नं. 9823044724** हे करीत आहेत.

## 9)जुगार :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे 14.45 वा. चे सुमारास, **विवेकानंद हॉस्पीटल समोरील रोडवर साठे चौक नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 3300/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2144 सुरेश लक्ष्मणराव घुगे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 173/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/209 मंगनाळे, मो.नं. 8805013480** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे 19.35 वा. चे सुमारास, **पाकीजा फंक्शन हॉलचे बाजुस मोकळया जागेत पाकीजानगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 1380/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/1812 शेख सत्तार मगदुम, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 403/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.नं. 9823827173** हे करीत आहेत.

**3)वजिराबाद :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे 18.40 वा. चे सुमारास, **कलामंदीर येथील वाईन शॉपचे बाजुस नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या मिलन नाईट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 1520/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी** पोहेकॉ/**2065 विजयकुमार कुरमय्या नंदे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 230/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1020 आडे, मो.नं. 9823467191** हे करीत आहेत.

## 10)प्रोव्हिबीशन :–

**कोंडलवाडी :–** दिनांक 21.05.2024 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **प्रॉपर कुंडलवाडी येथील शैलेश रयाखावर यांचे शेताजवळ असलेल्या नाल्यालगत झाडाखाली मौ. कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिंधी दारू किंमती 4500/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/दिपक साहेबराव मस्के, ने. पोस्टे कोंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कोंडलवाडी** गुरनं 56/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2821 चव्हाण मो.नं.9309872228** , हे करीत आहेत.

## 11)गळफास घेवुन आत्महत्या :–

**बारड :–**दिनांक 20.05.2024 रोजी चे 15.00 ते 19.00 वा. चे दरम्यान, **मौ. शेंबोली फाटा शिवारातील मयताचे शेतातील लिंबाचे झाडाचे फांदीस साडीच्या कापडाणे ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे गंगाधर भिवाजी जाधव, वय 36 वर्षे, व्यवसाय शेती रा. शेंबोली फाटा ता. मुदखेड जि. नांदेड,** यांनी सततची नापीकी व बँकेचे कर्ज कसे फेडावे या चिंतेतुन लिंबाच्या झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार भिवजी नारायण जाधव, वय 75 वर्षे, व्यवसाय शेती रा. शेंबोली फाटा ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे बारड** आ. मृ. 11/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री केदासे, मो.नं. 8483026950** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड